महाराष्ट्र शासन

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

दुरध्वनी क्रमांक (02456) 221461, ईमेल- dpohingoli@rediffmail.com

## -: प्रेस नोट : -

जिल्ह्यातील मदरसाच्या आधुनिकीकरण योजना मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार शासन निर्णय क्रमांक अविवि/२०१९/प्र.क्र.९८/का.६, दि. १४ मे,२०१९ अन्वये करण्यात आले आहे. सदर योजने अंतर्गत पात्र मदरसाची तसेच राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहूल शासन मान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळामध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना शासन निर्णय दि.०७.१०.२०१५ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत मदरसा, शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांचे प्रस्ताव सादर करणे बाबत सदर योजना सन २०१९-२० राबविण्यात येणार असून अनुदान मिळू इच्छिणाऱ्या मदरसा, शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांनी दिनांक ३१ ऑगस्ट,२०१९ सायंकाळी ५.०० वा. पर्यंत अल्पसंख्यांक विकास विभाग, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे अर्ज व नमूद सर्व कागदपत्रे दाखल करण्याचे जिल्हाधिकारी यांचे कडून आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा नियोजन अधिकारी
हिंगोली.

Scanned by CamScanner